## धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

करोना व्हायरसमुळे मिस्साला न जाऊ शकणाऱ्यांसाठी घरी करावयाची प्रार्थना

**बुधवार - २७ मे २०२०**

### स्वर्गाचे राणी

प्रमुख ः स्वर्गाचे राणी, उल्हास कर

प्रतिसाद ः आल्लेलुया

प्रमुख ः कारण तू जन्म दिलेला प्रभू येशू ख्रिस्त

प्रतिसाद ः आल्लेलुया

प्रमुख ः आपल्या म्हणण्याप्रमाणे, उठला आहे

प्रतिसाद ः आल्लेलुया

प्रमुख ः आम्हासाठी देवाजवळ विनंती कर

प्रतिसाद ः आल्लेलुया

प्रमुख ः हे कुमारी मरिये, आनंद व उल्हास कर, आल्लेलुया

प्रतिसाद ः कारण प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया

प्रमुख ः आपण प्रार्थना करू या

सर्वजण ः हे परमेश्वरा, तुझा पुत्र आमचा प्रभू येशू याच्या पुनरूत्थानाने तू सर्व जगाला आनंदित केलेस. त्याची माता धन्यवादित कुमारी मरिया हिच्या विनंतीमुळे आम्हाला अनंत जीवनाचा आनंद मिळावा अशी कृपा कर, ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

### नित्य सहाय्य करणाऱ्या मातेचा नोव्हेना

१. समूहगीत ः

पवित्र कोण ही? । पवित्र कोण ही? ॥ धृ ॥

हिची स्मिते उषेभरी । सुरम्य चंद्रिकेपरी ।
सतेज भास्करापरी । पवित्र कोण ही ? ॥ १॥



## २ . प्रार्थनेचा हेतू

प्रमुख ः अति पवित्र आणि निष्कलंक कुमारी माता मरिया, तू आमचे नित्य सहाय्य, आमचा आश्रय आणि आमची आशा आहेस .

लोक ः आज आम्ही तुजकडे येतो व मिळविलेल्या कृपादानाबद्दल आम्ही देवाचे आभार मानतो . हे नित्य सहाय्य करणारे माते, आम्ही तुझ्यावर प्रीती करतो . आमची प्रीती दर्शविण्यासाठी आम्ही नेहमीच तुझी सेवा करू व इतरांना तुजकडे आणण्याचा प्रयत्न करू असे वचन देतो .

प्रमुख ः हे नित्य सहाय्य करणाऱ्या माते, तुझा देवाजवळ प्रभाव आहे . म्हणून आमच्यासाठी पुढील कृपादाने मिळवून दे

लोक ः मोहावर विजय मिळविण्यासाठी सामर्थ्य, येशूविषयी परिपूर्ण प्रीती व चांगले मरण लाभावे की त्याद्वारे आम्हाला तुझ्या पुत्रासह शाश्वत जीवन जगता येईल .

प्रमुख ः हे नित्य सहाय्यक माते

लोक ः आम्हासाठी विनंती कर .

## ३ . लोकसमुदायाची प्रार्थना

प्रमुख ः हे प्रभू येशू, तुझ्या प्रिय मातेच्या एका शब्दासाठी तू काना येथे लग्नसमयी पाण्याचा द्राक्षारस केलास . आता आमच्या नित्य सहाय्य करणाऱ्या मातेचा गौरव करण्यास आही सर्वजण येथे जमलो आहोत, आमची प्रार्थना ऐक आणि आमचे मनःपूर्वक आभार स्वीकार .

लोक ः हे नित्य सहाय्यक माते, तुझ्या शक्तिमान नावाचा आम्ही धावा करतो . तू जिवंतांचे संरक्षण व मरण्याऱ्यांचे तारण आहेस . तुझे नाव सदैव विशेषतः मोहप्रसंगी व मरतेसमयी आमच्या ओठावर रहावे . तुझ्या नावात श्रद्धा व सामर्थ्य आहे . हे पवित्र माते, आमचा धावा ऐक . तुझे नाव उच्चारण्यातच आम्ही समाधान मानणारे नाहीत तर आमच्या रोजच्या जीवनात तू खरोखरच आमची नित्य सहाय्यक माता आहेस, असे आम्ही दर्शवू .

## ४ . ऐहिक गरजांसाठी प्रार्थना

लोक ः हे नित्य सहाय्यक माते, श्रद्धापूर्ण अंतःकरणाने आम्ही तुजसमोर गुडघे टेकतो . आमच्या रोजच्या जीवनातील अडीअडचणीच्या प्रसंगी आम्ही तुझा धावा करतो . संकट आणि दुःख आम्हाला उदासीन करतात . दुर्दैव आणि असमाधान यामुळे आम्हाला तीव्र यातना होतात . पदोपदी आम्हाला कूस आढळतात . हे दयाळू माते, आमच्यावर दया कर . आमच्या गरजा भागव . दुःखातून आम्हाला मुक्त कर आणि जर आम्ही अजून दुःख सहन करावे अशी ईश्वराची इच्छा असेल तर ते दुःख प्रेमाने व सहनशीलतेने सहन करण्यास आम्हास धैर्य दे . हे नित्य सहाय्यक माते, आमच्या पुण्यामुळे नव्हे तर तुझ्या प्रेमावर व सामर्थ्यावर अवलंबून अशी ही विनंती आम्ही तुजकडे करीत आहोत .

## ५ . लोकसमुदायाचे आवाहन

प्रमुखः आपण प्रार्थना करू या . आमचे परमगुरूस्वामी, महागुरूस्वामी व राज्यकर्ते ह्या सर्वांना ज्ञान व सुबुद्धी दे .

लोक ः हे प्रभो, मरियामातेसह आम्ही विनवितो .

प्रमुख ः सर्व लोकांनी बंधुत्वाच्या नात्याने रहावे, त्यांच्यात सामाजिक व धार्मिक एकीकरण दिसून यावे म्हणून

लोक ः हे प्रभो, मरियामातेसह आम्ही विनवितो .

प्रमुख ः नोव्हेना करणाऱ्या कुटुंबातील मुलांमुलींना पवित्र आत्म्याने कृपा द्यावी व जीवनात योग्य मार्गदर्शन करावे म्हणून

लोक ः हे प्रभो, मरियामातेसह आम्ही विनवितो .

प्रमुख ः नोव्हेना करणाऱ्यांना आरोग्य लाभावे आणि जे आजारी आहेत ते तुझ्या इच्छेप्रमाणे बरे व्हावेत म्हणून

लोक ः हे प्रभो, मरियामातेसह आम्ही विनवितो .

प्रमुख ः मरण पावलेल्या नोव्हेनाच्या भक्तांना व सर्व मृतांना शांती लाभावी म्हणून

लोक ः हे प्रभो, मरियामातेसह आम्ही विनवितो .

प्रमुख ः आजच्या ह्या नोव्हेनाचा विशेष हेतू व येथे हजर असलेल्यांच्या गरजा मान्य व्हाव्यात म्हणून

लोक ः हे प्रभो, मरियामातेसह आम्ही विनवितो .

प्रमुख ः सर्व लोकांना तुझ्या सत्याचा प्रकाश लाभावा व त्यांना तुझ्या प्रेमाचा अनुभव यावा म्हणून

लोक ः हे प्रभो, मरियामातेसह आम्ही विनवितो .

प्रमुख ः आपल्या सर्व विनंत्या सफल होण्यासाठी आपण मनात पवित्र मरियेकडे प्रार्थना करू या .

(क्षणभर शांत राहू या)

## ६ . आभार

प्रमुख ः हे प्रभो, तू आम्हाला कृपेचे नवजीवन दिल्याबद्दल

लोक ः आम्ही तुझे मरियामातेसह आभार मानतो .

प्रमुख ः साक्रामेंताद्वारे मिळणाऱ्या कृपेबद्दल

लोक ः हे प्रभो, आम्ही तुझे मरियामातेसह आभार मानतो .

प्रमुख ः आम्हा नोव्हेना करणाऱ्यांना तू दिलेल्या दैवी व ऐहिक देणग्यांबद्दल

लोक ः हे प्रभो,आम्ही तुझे मरियामातेसह आभार मानतो .

प्रमुख ः आपली विनंती मान्य केल्याबद्दल आपण नित्य सहाय्यक मातेचे आभार मानू या .

७ . गायन ः

नमस्कार हे राणी कुमारी । नमस्कार हे राणी || धृ ||

आमुची राखण तू करणारी । निर्दोषी निर्मल जननी ।
नमस्कार हे राणी || १ ||

८ . पवित्र शास्त्राचे वाचन

९ . आजाऱ्यांना आशीर्वाद

प्रमुख ः आपण प्रार्थना करू या .

लोक ः हे प्रभो, शारीरिक आजाराने दुर्बळ झालेल्या ह्या सेवकांकडे आपली दयादृष्टी वळव व तू उत्पन्न केलेल्या आत्म्यांना उत्तेजित कर, म्हणजे कष्टाने शुद्ध होऊन तुझ्या देयेने आम्ही बचावले जाऊ असे आम्ही मानू . आमेन .

प्रमुख ः आपले संरक्षण करावयास प्रभू येशू आपल्याजवळ असो, आपले पालन करावयास तो आपल्यामध्ये असो, आपले मार्गदर्शन करावयास तो आपल्या समोर असो, आपला सांभाळ करावयास तो आपल्या पाठीशी असो, आपल्याला आशीर्वाद द्यावयास तो आपल्यावर असो, पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावे .

लोक ः आमेन .

१० . लोकसमुदायाचे श्रद्धानिवेदन

प्रमुख ः लोकसमुदायाचे श्रद्धानिवेदन

लोक ः हे नित्य सहाय्यक माते, तू धनवंत व दयाळू आहेस . परमेश्वराकडून मिळणाऱ्या सर्व कृपादानांचे तू वाटप करतेस . तू पाप्यांची आशा आहेस . हे प्रिय माते, आम्ही तुजकडे येतो . आमचे जीवन तुझ्या हातात आहे . आम्ही तुझी लेकरें आहोत . हे प्रिय माते, आमची काळजी घे . कारण तू आमची काळजी वाहात असताना आम्हाला कसलीही भीती वाटत नाही . ख्रिस्ताकडून तू आमच्या पापांची क्षमा मागतेस . ख्रिस्तासमवेत तू सर्व नरकांच्या शक्तीपेक्षा अधिक सामर्थ्यवान आहेस . न्याय देणारा ख्रिस्त, जो तुझा पुत्र व आमचा बंधू आहे, तुझ्या सहवासात त्याची आम्ही वाट पाहात आहोत . मोहासमयी आम्हाला तुझा विसर पडू देऊ नकोस . हे नित्य सहाय्यक माते, आमच्या पापांची क्षमा, येशूवर प्रीती, जीवनात कायम चिकाटी आणि तुजकडे धाव घेण्याची सद्बुद्धी ही कृपादाने तू आमच्यासाठी मिळव .

११ . नमो कृपापूर्ण मरिया

प्रमुख ः सर्व युगातील विश्वासू लोकांशी एकचित्त होऊन मरियेची स्तुती करून तिचा आश्रय घेऊ या .

लोक ः नमो कृपापूर्ण मरिये, प्रभू तुझ्याठायी आहे, धन्य तू स्त्रियांमध्ये आणि धन्य तुझ्या उदराचे फळ येशू . हे पवित्र मरिये, देवाचे माते, आम्हा पाप्यांसाठी आता आणि आमच्या मरणाच्या वेळी विनंती कर आमेन .

प्रमुख ः हे पवित्र देवमाते, आम्हासाठी विनंती कर.

लोक ः ख्रिस्ताने दिलेल्या वचनास आम्ही पात्र ठरावे म्हणून.

प्रमुख ः आपण प्रार्थना करू या ः हे प्रभो, तू आपली माता मरिया आम्हाला नित्य सहाय्य करणारी माता म्हणून दिली आहेस, तिच्या तसबिरीसमोर आम्ही वंदन करतो. तिच्या सहाय्याची अपेक्षा करणाऱ्या आम्हास तुझ्या तारणाचे फळ दाखव.

लोक ः आमेन.

**गायन ः देवा तुझे वचन ... . गीत क्र. २५**

कुटुंब प्रमुख ः पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्या नावे

सर्व ः आमेन.

कुटुंब प्रमुख ः परमेश्वर आपले घर आणि हृदय विपुल शांतीने भरीत असतो. आपण त्याची आराधना करू या. परमेश्वर सदैव सुवंदित असो.

सर्व ः परमेश्वर सदैव सुवंदित असो.

## पश्चाताप विधी

कुटुंब प्रमुख ः प्रिय कुटुंबियांनो, या प्रार्थना विधीत सहभागी होण्यास आपण पात्र ठरावे म्हणून आपण आपल्या पापांची आठवण करू या व ईश्वराकडे विश्वासाने क्षमा मागू या.

कुटुंब प्रमुख ः प्रभू येशू, तू आजाऱ्यांना बरे केलेस.

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर. .

कुटुंब प्रमुख ः प्रभू ख्रिस्ता, तू पाप्यांना क्षमा केलीस.

सर्व ः हे ख्रिस्ता, आम्हावर दया कर.

कुटुंब प्रमुख ः प्रभू येशू, आम्हाला शक्ती देण्यासाठी तू स्वतःला समर्पित केलेस.

सर्व ः हे प्रभो, आम्हावर दया कर.

कुटुंब प्रमुख ः सर्वसमर्थ परमेश्वर आम्हांवर दया करो व आमच्या पापांची क्षमा करून आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

सर्व ः आमेन.

**आपण प्रार्थना करू या ः**

हे दयाळू परमेश्वरा, आम्ही संपूर्ण अंतःकरणाने तुझी भक्ती करावी व निःस्वार्थी प्रेमाने संघटितरित्या कार्य करावे याकरिता पवित्र आत्म्याच्या कृपासामर्थ्याने तुझ्या ख्रिस्तसभेत ऐक्य निर्माण कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशूख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

सर्व ः आमेन.

**प्रभूशब्दविधी** **प्रेषितांची कृत्ये २० ः २८ – ३८**

वाचक ः प्रेषितांची कृत्ये ह्या पुस्तकामधून घेतलेले वाचन ः

*"मी तुम्हास तुमची वाढ करावयास आणि तुम्हाला तुमचे वतन द्यावयास समर्थ असलेल्या प्रभूकडे सोपवतो."*

पौलने इफिसच्या सभास्थानातील वडीलवर्गाला पुढील शब्दांनी उद्देशून म्हटले, "तुम्ही स्वतःकडे आणि ज्या कळपात पवित्र आत्म्याने तुम्हास अध्यक्ष करून ठेवले त्या सर्वांकडे लक्ष द्या. देवाची जी मंडळी त्याने आपल्या रक्ताने स्वतःकरिता मिळवली तिचे पालन तुम्ही करावे. मी गेल्यावर कळपाची दयामाया न करणारे क्रूर लांडगे तुम्हामध्ये शिरतील, हे मी जाणून आहे. तुम्हांपैकीही माणसे उठून शिष्यांना आपल्यामागे ओढून घेण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील. ह्यास्तव मी तीन वर्षे रात्रंदिवस अश्रू गाळीत प्रत्येकास बोध करण्यास खंड पडू दिला नाही, ही आठवण ठेवून सावध राहा. आता मी तुम्हास प्रभूकडे आणि त्याच्या कृपेच्या वचनाकडे सोपवतो. तो तुमची वाढ करावयास आणि पवित्र केलेल्या सर्व लोकांमध्ये वतन द्यावयास समर्थ आहे. मी कोणाच्या सोन्याचा, रूप्याचा किंवा वस्त्रांचा लोभ धरला नाही. माझ्या आणि माझ्या सोबत्यांच्या गरजा भागवण्याकरता ह्याच हातांनी श्रम केले ते तुम्ही स्वतः जाणून आहा. सर्व गोष्टींत मी तुम्हाला कित्ता घालून दाखवले आहे की, तसेच तुम्हीही श्रम करून दुर्बळांना साहाय्य करावे आणि "घेण्यापेक्षा देणे ह्यात जास्त धन्यता आहे" असे जे वचन प्रभू येशू स्वतः म्हणाला होता त्याची आठवण ठेवावी.

असे बोलल्यावर त्याने गुडघे टेकून त्या सर्वांबरोबर प्रार्थना केली. तेव्हा ते सर्व फार रडले आणि त्यांनी पोलच्या गळयात गळा घालून त्याचे पुष्कळ मुके घेतले. "माझे तोंड तुमच्या दृष्टीस ह्यापुढे पडणार नाही," असे जे त्याने म्हटले होते त्यावरून त्यांना विशेष दुःख झाले. मग त्यांनी त्याला तारवापर्यंत पोहोचवले.

हा प्रभूचा शब्द आहे.

सर्व ः देवाला धन्यवाद.

**प्रतिसाद स्तोत्र ः** **स्तोत्र ६७ ः २९ - ३०, ३३ – ३६**

प्रतिसाद ः पृथ्वीवरील राष्ट्रांनो, तुम्ही देवाचे गीत गा.

१. तू प्रबळ व्हावे असे तुझ्या देवाने आज्ञापिले आहे,
हे देवा, तू आम्हासाठी जे केले आहे ते दृढ कर.
येरूशलेमातील तुझ्या मंदिराकरिता
राजे तुला भेटी आणतील.

प्रतिसाद ः पृथ्वीवरील राष्ट्रांनो, तुम्ही देवाचे गीत गा.

२. पृथ्वीवरील राष्ट्रांनो, तुम्ही देवाचे गीत गा,
प्रभूची स्तोत्रे गा.
पुरातन आकाशांच्या आकाशावर आरूढ होऊन
जो स्वारी करतो, त्याची स्तोत्रे गा.
पाहा, तो आपला शब्द, सामर्थ्याचा शब्द उच्चारतो.
देवाच्या बलाचे वर्णन करा.

प्रतिसाद ः पृथ्वीवरील राष्ट्रांनो, तुम्ही देवाचे गीत गा.

३. इसरायलवर त्याचे ऐश्वर्य आणि गगनमंडळात
त्याचे बल आहे.
तुझ्या पवित्र स्थानातून कार्य करणारा देव
भयप्रद आहे.
इसरायलचा देव आपल्या लोकांस बल आणि
सामर्थ्य देतो.
देवाचा धन्यवाद होवो!

प्रतिसाद ः पृथ्वीवरील राष्ट्रांनो, तुम्ही देवाचे गीत गा.

**शुभवर्तमान जयघोष** **योहान १४ ः १६**

आलेलुया, आलेलुया!
मी पित्याला विनंती करीन,
मग तो तुम्हाला दुसरा कैवारी देईल.
अशासाठी की त्याने तुम्हाबरोबर सदासर्वदा राहावे.
आलेलुया

**शुभवर्तमान ः** **योहान १७ ः ११ - १९**

वाचक ः योहानाच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन.

सर्व ः हे प्रभो, तुझा गौरव असो.

*"बापा जसे आपण एक आहो तसे त्यांनी एक व्हावे."*

येशूने स्वर्गाकडे दृष्टी लावून म्हटले, "हे पवित्र बापा, तू मला दिलेल्या तुझ्या नावात त्यांना राख, जसे आपण एक आहो तसे त्यांनी एक व्हावे. जोपर्यंत मी त्यांच्याबरोबर होतो तोपर्यंत तू मला दिलेल्या तुझ्या नावात मी त्यांना राखले. मी त्यांचा सांभाळ केला आणि नाशाच्या पुत्राशिवाय कोणाचा नाश झाला नाही, शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून असे झाले. पण आता मी तुझ्याकडे येत आहे आणि माझा आनंद त्यांच्या ठायी परिपूर्ण व्हावा म्हणून मी जगात ह्या गोष्टी बोलतो. मी त्यांना तुझे वचन दिले आहे; जगाने त्यांचा द्वेष केला, कारण जसा मी जगाचा नाही तसे हेही जगाचे नाहीत. तू त्यांना जगातून काढून घ्यावे अशी मी विनंती करीत नाही, तर तू त्यांना वाईटापासून राखावे अशी विनंती करतो. जसा मी जगाचा नाही तसे तेही जगाचे नाहीत. तू त्यांना सत्यात समर्पित कर; तुझे वचन हेच सत्य आहे. जसे तू मला जगात पाठवले तसे मीही त्यांना जगात पाठवले आणि त्यांनीही सत्यात समर्पित व्हावे म्हणून मी त्यांच्याकरिता स्वतःला समर्पित करतो."

प्रभूचे हे शुभवर्तमान.

सर्व ः हे ख्रिस्ता, तुझी स्तुती असो.

**चिंतन** ः बाप्तिस्मा घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून ख्रिस्तसभेची एक अपेक्षा असते, ती म्हणजे त्या व्यक्तीने उत्तम मेंढपाळाचे कार्य करावे. हे कार्य करीत असताना कदाचित आपल्यावर अन्याय होऊ शकतो. गैरसमज होऊ शकतो. लोकांना वाटेल की कदाचित आपल्या स्वार्थासाठी हे कार्य करतो. परंतु हे कार्य करीत असताना मी स्वतःचा विचार न करता निःस्वार्थीपणे देवाचे पवित्र कार्य पुढे चालू ठेवू शकतो.

जेव्हा मी हे कार्य करतो त्यावेळेला दुर्बळांना विशेष मदत होईल अशाप्रकारे ते केले पाहिजे. "आनंद देण्यात असतो घेण्यात नाही", ह्याची आठवण आपण नेहमी ठेवली पाहिजे. संत मदर तेरेजा हिचा आदर्श नजरेसमोर ठेवून आम्ही हे कार्य केले तर अधिक उत्तम होईल. परमेश्वराने जे वरदान आम्हाला दिले आहे त्याचा उपयोग आपण सातत्याने केला पाहिजे.

थोडावेळ शांत राहून आपण चिंतन करू या.

**आपण प्रार्थना करू याः**

हे प्रभो, तुझ्या आदेशानुसार आम्ही हा प्रार्थनाविधी साजरा करीत आहोत त्याचा तू स्वीकार कर. या पवित्र विधीद्वारे आम्ही तुझी उपासना करीत आहोत. यांच्या कृपाप्रसादाने तुझे आम्हामधील तारणकार्य परिपूर्णतेला ने. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

सर्वः आमेन.

**प्रभूची प्रार्थना**

कुटुंब प्रमुख ः प्रभू येशूच्या शब्दांत आपण परमेश्वर पित्याकडे आत्मविश्वासाने प्रार्थना करू याः

सर्व ः आमच्या स्वर्गीय बापा । तुझे नाव पवित्र मानले जावो । तुझे राज्य येवो । जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही । तुझ्या इच्छेप्रमाणे होवो । आमची दररोजची भाकर । आज आम्हाला दे । जशी आम्ही । आमच्या अपराध करणाऱ्यांना क्षमा करतो । तशी तू आमच्या अपराधांची । क्षमा कर । आणि आम्हाला । मोहात पडू देऊ नकोस । पण वाईटापासून । आम्हाला सोडव. आमेन.

**शांतीवंदना ः**

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो, सर्व वाईटांपासून आमचे संरक्षण कर. या जीवनात तू आम्हाला शांती दे. आमच्या तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या पुन्हा येण्याची व शाश्वत जीवनाची आशेने वाट पहात असताना आम्ही तुझ्या दयेच्या साहाय्याने पापांपासून दूर राहावे व सर्व संकटापासून सुरक्षित असावे.

सर्व ः कारण राज्य, अधिकार व गौरव सदासर्वदा तुझाच आहे.

कुटुंब प्रमुख ः हे प्रभो येशू ख्रिस्ता, तू आपल्या प्रेषितांस म्हणालास, "मी तुम्हांसाठी शांती राखून ठेवली आहे. मी माझी शांती तुम्हास देतो". म्हणून आमच्या पापांकडे पाहू नकोस तर तुझ्या ख्रिस्तसभेच्या श्रद्धेकडे पहा आणि आम्हाला तुझ्या स्वर्गीय राज्यातील शांती व ऐक्य देण्याची कृपा कर. तू नित्यजिवी असून सदासर्वदा राज्य करतोस.

सर्व ः आमेन

कुटुंब प्रमुख ः प्रभूची शांती आपल्या बरोबर सदा असो.

सर्व ः आणि तुम्हाबरोबर सुद्धा.

कुटुंब प्रमुख ः आपण एकमेकांस शांतीवंदन करू या.

## आध्यात्मिक ख्रिस्त प्रसाद विधी



माझ्या प्रिय येशू,

तू आल्तारावरील पवित्र साक्रामेंतात जातीने हजर असतोस

ह्यावर माझी नितांत श्रद्धा आहे.

सर्वांपेक्षा माझे तुझ्यावर प्रेम आहे आणि

माझ्यामध्ये तू यावा अशी माझी तिव्र इच्छा आहे.

ह्या दिवसात मी तुला पवित्र मिस्सा साक्रामेंताद्वारे स्वीकारू शकत नसलो

तरी निदान आध्यात्मिक स्वरूपात तू माझ्या अंतःकरणात ये.

तू नेहमीच मजबरोबर असतोस.

मी तुला मिठी मारतो.

तुझ्यापासून माझा कधीही वियोग होऊ देऊ नकोस.

आमेन.

**आपण प्रार्थना करू या ः**

हे प्रभो, या प्रार्थनाविधीमध्ये आम्ही सहभागी झालो आहोत. याच्या कृपासामर्थ्याने आम्हामधील दैवी जीवनाचा विकास कर. पापांपासून आमची सुटका कर व या पवित्र संस्कारासाठी आम्हाला अधिकाधिक पात्र कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू येशूच्या नावाने करतो.

सर्व ः आमेन.

**समारोपविधी**

कुटुंब प्रमुख ः प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

सर्व ः आमेन.

कुटुंब प्रमुख ः आपण सर्व ख्रिस्ताच्या शांतीत जाऊ या, आलेलुया, आलेलुया!

सर्व ः देवाचे आभार मानू या, आलेलुया, आलेलुया!

## कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रार्थना

सर्वसमर्थ व दयावंत परमेश्वरा, सर्व जगाला तू तुझे प्रेम सदैव व सर्वत्र दाखवत असतोस.

कोरोना विषाणुची झळ पोहोचलेल्या ह्या विश्वाच्या विविध भागातील लोकांसाठी आम्ही करीत असलेली प्रार्थना दयेने ऐक.

या रोगाच्या संसर्गामुळे निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी, ह्या आजाराने पछाडलेल्या व्यक्तींना व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्यदायी स्पर्श लाभण्यासाठी आम्ही तुझ्याकडे कळकळीने याचना करतो.

डॉक्टर्स, नर्सेस व सेवकवर्ग संबंधितांची काळजी घेत आहेत, सेवा पुरवित आहेत, त्यांना ह्या संसर्गापासून सुरक्षित ठेव आणि ह्यापुढेदेखील कार्य करण्यासाठी त्यांना तुझी वृत्ती व पवृत्ती लाभावी म्हणून आम्ही प्रार्थना करतो.

ह्या आजारावर मात करण्याकरिता लवकरात लवकर प्रभावी उपाय शोधता यावा म्हणून संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांसाठी आम्ही तुझी करूणा भाकतो.

लोकांच्या हितासाठी झटणाऱ्या सरकारी व आरोग्य यंत्रणांना ह्या आजारावर मात करण्यासाठी योग्य पावले उचलता यावीत म्हणून आम्ही प्रार्थना करतो.

ही प्रार्थना आम्ही प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

गायन ः प्रभू उठला (चरण २) ..... गीत कमांक २८७

## पवित्र आत्म्यासाठी नोव्हेना प्रार्थना



हे माझ्या परमेश्वरा, । पवित्र आत्म्या, । आम्ही तुला नमन करतो. । आम्ही तुझ्याशिवाय काहीही करू शकत नाहीत, । हे तुझ्या दैवी उपस्थितीत । आम्ही मान्य करतो. । हे पवित्र आत्म्या, । महान कैवारी, तू गरीबांचा

पिता आहेस. ।तू उत्कृष्ट सांत्वनकर्ता आहेस. ।आमचा तारणारा येशूख्रिस्त ।ह्याने आश्वासन दिले होते की ।मी तुम्हाला अनाथ असे सोडणार नाही. ।हे पवित्र आत्म्या, ।आम्ही परमेश्वराच्या प्रेमास अपात्र आहोत. ।तू येशूची आई मरिया ।व पहिल्या शिष्यांवर ।पेन्टेकॉस्टच्या दिवशी अवतरलास ।व त्यांना तुझ्या दानांनी भरलेस. ।हे पवित्र आत्म्या, ।त्याच दयेने व दानशूरतेने, ।त्या दानांचा आम्हावर वर्षाव कर. ।आमच्या अंतःकरणात ।तुला पसंत नसलेले ।असे सर्व नष्ट कर ।व त्यात येऊन ।तू वस्ती कर. ।आमच्या शाश्वत चांगुलपणासाठी असलेल्या गोष्टी ।आम्हाला स्पष्ट दिसाव्यात ।व समजाव्यात ।म्हणून आमचे मन ।तुझ्या दैवी प्रकाशाने ।उल्हासित कर. ।हे पवित्र आत्म्या, ।आमचे अंतःकरण ।तुझ्या शुद्ध प्रेमाने भर. ।विविध बंधनात जखडुन ठेवणा-या आसक्ती ।आमच्या हृदयातून काढून टाक. ।आम्हाला येशूच्या प्रेमाने भर. ।परमेश्वरी इच्छेला ।आमच्या जीवनात प्राधान्य असावे ।म्हणून पवित्र आशा - आकांक्षांनी जगण्यास ।आम्हाला प्रेरणा दे. ।नम्रता, विरक्ती, आज्ञाधारकपणा ।व ऐहिक जगाच्या मोहापासून ।दूर राहण्याचा ।प्रभू येशूने घालून दिलेला आदर्श ।आमच्या जीवनात व कृतीत उतरविण्यास ।आम्हाला कृपा दे. आमेन .

आमच्या स्वर्गीय बापा व नमो मरिया